# वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा समारोप कार्यक्रम संपन्न

वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे "मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा" कार्यक्रम दि. 3 जाने. ते 15 जानेवारी पर्यंत आयोजीत करण्यात आला होता. "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" कार्यक्रमामध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती, राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रीय युवा दिनानिमित्त एचआयव्ही पदर्शनी व वक्तृत्व स्पर्धा "एच. आय. व्ही. –युवा आणि आव्हाने या विषयांवर घेण्यात आली. त्यामध्ये पंधरा विद्यार्थ्यानी सहभाग घेतला असून प्रथम पुरस्कार सोनाली शिरस्कर, व्दितीय पुरस्कार निशा आस्वानी तर तृतीय पुरस्कार साईकुमार वेमुला या विद्यार्थ्यांनी पटकाविला आहे.

महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. एन. डी. पार्लावार, यांचे अध्यक्षतेखाली तसेच उमेश वैद्य, माजी. मुख्याध्यापक विवेकानंद हायस्कुल यवतमाळ व व. ना. जिल्हा रूग्णालय यवतमाळ डॉ. तरंगतुषार वारे, डॉ. मनोज तगडपल्लेवार, प्रा. अंजली गहरवार, प्रा. धिरज वसुले, रा. से.यो. कार्यक्रम अधिकारी, डॉ. रविंद्र सातभाई, डॉ. प्रशांत शिंगोटे, श्री. मंगेश शेटे, सहायक कुलसचिव, यांचे उपस्तिथीत पार पडला.

या प्रसंगी डॉ. पार्लावार यांनी सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकांनद यांचे जीवनावर प्रकाश टाकुन मार्गदर्शन केले. तसेच लोप पावत असलेली मराठी भाषेचे संवर्धन करण्याची गरज असल्याचे विचार व्यक्त केले. तसेच उमेश वैद्य यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जीवनवृत्तांत व कार्य संभोदित केले. तसेच त्यांनी मराठी सुप्रसिध्द कवयित्री बहिनाबाई चौधरी यांच्या "मन वढाय वढाय" या कवितेचा आधार घेवून मनावर प्रभुत्व मिळवायचे असेल तर चंचल मनावर स्वामी विवेकानंद यांचे विचारांची शिकवण आत्मसात करावी असे विचार प्रकट केले. तसेच राष्ट्रीय युवा दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा "एच. आय. व्ही. –युवा आणि आव्हाने या विषयांवर डॉ. तरंगतुषार वारे, डॉ. मनोज तगडपल्लेवार यांनी विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले. तसेच मराठी भाषा संवर्धन पंधरवडामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख साहित्यीक विष्णु वामण शिरवाडकर ;कुसुमाग्रजद्ध व अनेक मराठी लेखकांनी मराठी भाषा संवर्धनासाठी कार्य केले त्यांचा गौरव करण्यात आला. मराठी संस्कृती ही मराठी साहित्याची देण असून हि संस्कृती टिकविण्याकरिता अधिकाधिक मराठी वाचण, लेखन करावे व मराठी भाषा संस्कृतीला विकसित करावे असे आवाहण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांकरिता नटसंम्राट, युगंधर, श्यामची आई, मृत्यूजंय, विशाखा, एकच प्याला, अग्णीपंख, एक होता कार्व्हर, इ. मौल्यवान साहित्याचे प्रदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन कु. सोनाली शिरस्कर हिने तर आभार कुशाल पाटील या विद्यार्थ्याने केले. महाविद्यालयातील विद्यार्थी प्रज्वल डोंगरे, हर्षा माधनकर, विश्वास राठोड, प्रतिक्षा पथाडे, सुरज गुप्ता, व मिताली राहाटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे विशेष म्हणजे तेलंगणातील विवके गौरू व साईकुमार वेमुला या विद्यार्थ्यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमीत्त मराठी भाषेत आपले विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. या कार्यक्रमाला डॉ. संदेश बांगर, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, अस्मिता पाटील, कु. भारती मेश्राम, पंकज जैन, श्री रूपेश राऊत, डॉ. वैष्णवी परमा,

एकनाथ भंकाळे, निळकंठ मानकर, प्रविण डोंगरे, शुभम धार्मिक, इ. कर्मचारी, व  विद्यार्थी उपस्थीत होते.